महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार








छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ७८ वे | दिनांक : ११/०३/२०२६ | वार : बुधवार


## राज्यात २०० परवानाधारक भूमापकांची नियुक्ती : मोजणी प्रकरणांचा होणार जलद निपटारा



**मुंबई** : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारने राज्यातील मोजणी प्रकरणांचा जलद निपटारा करण्यासाठी २०० परवानाधारक भूमापकांची नियुक्ती करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. सरकारच्या या निर्णयामुळे मोजणी प्रकरणांचा वेळेत निपटारा होऊन राज्यातील नागरिकांना अधिक जलद, पारदर्शक व दर्जेदार सेवा उपलब्ध होणार आहे.

राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज विधानसभेत अर्थसंकल्पावर चर्चा सुरू असताना सरकारच्या उपरोक्त निर्णयाची माहिती दिली. ते यासंबंधीचे निवेदन करताना म्हणाले, राज्यात मोजणी प्रकरणांच्या वाढत्या संख्येच्या पार्श्वभूमीवर मोजणी प्रकरणांचा जलद, पारदर्शक व गुणवत्तापूर्ण निपटारा करण्यासाठी खाजगी परवानाधारक भूमापक / भूमापन अभिकरण यांची मोजणीकामी नियुक्ती करण्याचा महत्वपूर्ण निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील शासनाने घेतला आहे. त्यानुसार, यानुसार, प्रलंबित मोजणी प्रकरणांचा तातडीने निपटारा करण्यासाठी २०० परवानाधारक भूमापकांची नियुक्ती करण्यात आली आहे.

या भूमापकांना प्रशिक्षण देऊन ३० मार्च २०२६ पासून भूमि अभिलेख विभागाच्या कामासाठी नियुक्त करण्यात येणार आहे. प्रारंभी ज्या १७ तालुक्यांमध्ये मोजणी प्रकरणे मोठ्या प्रमाणात प्रलंबित आहेत, त्या ठिकाणी त्यांची नेमणूक करण्यात येणार आहे. यासोबतच राज्यातील १८ तालुक्यांमध्ये पोटहिस्सा मोजणीचा पथदर्शी प्रकल्प देखील राबविण्यात येत आहे. या उपक्रमांमुळे मोजणी प्रकरणांचा वेळेत निपटारा होऊन नागरिकांना अधिक जलद, पारदर्शक व दर्जेदार सेवा उपलब्ध होतील, तसेच महसूल अभिलेखांचे अद्ययावतीकरण अधिक प्रभावीपणे करता येईल. या प्रकरणी विधानसभेतील सदस्यांनी उपस्थित केलेल्या शंका व सूचनांचे समाधानकारक निरसन करण्याचा प्रयत्न केला, असेही बावनकुळे यांनी यावेळी सांगितले.

तत्पूर्वी, चंद्रशेखर बावनकुळे यांनी राज्यात ११ नवीन अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयांची निर्मिती करण्यात येणार असल्याचीही घोषणा केली. ते म्हणाले, राज्यातील जिल्ह्यांची लोकसंख्या, जिल्ह्यांचे भौगोलिक क्षेत्र, जिल्ह्याचे दुर्गम क्षेत्र, तालुक्यांची संख्या, प्रशासकीय सोय, स्थानिक परिस्थिती विचारात घेऊन महसूल विभागाने ११ नवे अप्पर जिल्हाधिकारी कार्यालये निर्मिती प्रस्तावित केली होती. विभागाच्या प्रस्तावाची सखोल तपासणी करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या उच्चस्तरीय सचिव समितीने ९ जानेवारी २०२६ च्या बैठकीत ११ नवे अप्पर जिल्हाधिकारी कार्यालये व प्रत्येक कार्यालयात एकूण १३ पदे याप्रमाणे १४३ पदे निर्माण करण्यास मान्यता दिली आहे.

मंत्रिमंडळाच्या १० फेब्रुवारीच्या बैठकीत अप्पर जिल्हाधिकारी संवर्गातील एस २५ वेतन श्रेणीतील ११ पदे निर्माण करण्यास अंतिम मान्यता देण्यात आली. हे अप्पर जिल्हाधिकारी कार्यालये ठाणे, रत्नागिरी, पुणे, सातारा, सोलापूर, जळगाव, नांदेड, अमरावती, यवतमाळ, बुलढाणा व नागपूर याठिकाणी प्रस्तावित करण्यात आली आहेत. याला मंजुरी देण्यात आली आहे. त्यामुळे या जिल्ह्यांमध्ये आता लवकरच विभागीय आयुक्त हे कार्यालय कुठे असणार? हे ठरवण्यात येईल. त्यानंतर अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयांची निर्मिती होईल, असे बावनकुळे म्हणाले.

## छत्रपती संभाजीनगरचा रील स्टार अरुण तुपेचे अकाली निधन



**छत्रपती संभाजीनगर** : लोकप्रिय रील स्टार अरुण तुपेचे आज सकाळी निधन झाले आहे. बालाजी नगर येथील त्याच्या घरी सकाळच्या सुमारास मृतावस्थेत आढळून आला. अरुणच्या अकाली निधनाने सोशल मीडियावर हळहळ व्यक्त केली जात आहे.

मिळालेल्या माहिती नुसार, अरुण तुपे सकाळी त्याच्या कुटुंबीयांना अत्यंत गंभीर अवस्थेत आढळून आला. त्याला तातडीने जवळच्या खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी त्याला तपासून मृत घोषित केले. मात्र, अरुणचा मृत्यू कशामुळे झाला याचे कारण अद्याप समजू शकले नाही.

इन्स्टाग्रामवर अरुण तुपेने मृत्यूच्या २२ तास आधीच एक रील शेअर केली होती. तसेच त्या रीलवरील कमेंट्सला तो रिप्लाय देखील देत होता. त्यामुळे अचानक असे काय घडले ज्यामुळे त्याचा मृत्यू झाला, हे कारण अद्याप समजू शकले नाहीये. संभाजीनगरच्या घाटी रुग्णालयात त्याच्या मृतदेहावर शवविच्छेदन करण्यात आले. त्यानंतर त्याच्या गावी त्याच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आल्याची माहिती मिळाली आहे.

अरुण तुपेने सोशल मीडियावर आपल्या अभिनयाने वेगळी ओळख निर्माण केली होती. त्याचे व्हिडिओ कॉमेडी असायचे. त्याचा स्वभाव देखील नेहमीच हसता-खेळता असायचा. त्याच्या मनमिळाऊ स्वभावामुळे त्याचा मित्र परिवार देखील मोठा होता. त्याच्या अकाली निधनाने मित्र परिवारावरही शोककळा पसरली आहे.

## गॅसची टंचाई तात्काळ सोडवा अन्यथा विद्यार्थ्यांसह रस्त्यावर उतरू : रोहिणी खडसे



**पुणे** : इराण, अमेरिका आणि इस्त्राइलमध्ये सुरू असलेल्या युद्धामुळे अनेक देशांमध्ये आता तेलाची तसेच सीएनजी गॅसची टंचाई उद्भवली आहे. भारतातही याची झळ पोहोचण्यास सुरू झाली असल्याचे दिसत आहे. यावरून आता विरोधकांनी सरकारवर टीकेची झोड उठवली आहे. त्यात गॅस टंचाईचा विषय तात्काळ सोडवा अन्यथा वेळ आली तर विद्यार्थ्यांसह रस्त्यावर उतरू, असा इशारा राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाच्या महिला प्रदेशाध्यक्षा रोहिणी खडसे यांनी दिला आहे.

रोहिणी खडसे म्हणाल्या, मुंबई-पुणे आणि परिसरात ग्रामीण भागातून मोठ्या प्रमाणात विद्यार्थी शिक्षणासाठी येत असतात. या परिस्थितीमुळे विद्यार्थ्यांवर उपासमारीची वेळ येऊ शकते. तसेच परिस्थिती आटोक्यात आली नाही तर घरगुती गॅसचा तुटवडा निर्माण होण्यास सुरुवात होईल. शासनाने यात गांभीर्याने लक्ष घालून तोडगा काढावा, हसे तर केंद्राशी बोलून यावर तोडगा काढावा, अन्यथा वेळ आली तर विद्यार्थ्यांसह रस्त्यावर उतरू, असा इशारा खडसे यांनी दिला आहे.

पुढे बोलताना रोहिणी खडसे म्हणाल्या, आखाती देशात सुरू असलेल्या युद्धाची झळ आता भारतातील सामान्य जनतेलाही बसू लागली आहे. या युद्धामुळे मोठ्या प्रमाणात गॅसची मोठी टंचाई निर्माण झाली आहे. मुंबई-पुणे सारख्या शहरांमध्ये गॅसच्या अभावी हॉटेल्स, खानावळी हळूहळू बंद होत आहेत, अशी माहिती खडसे यांनी दिली आहे.

दरम्यान, अमेरिका, इस्त्राइल आणि इराणमध्ये सध्या भीषण युद्ध सुरू आहे. आखाती देशांमध्ये सुरू असलेल्या या युद्धामुळे येथून भारताला होणारा खनिज तेलाचा आणि नैसर्गिक वायुचा पुरवठा जवळपास ठप्प झाला आहे. त्यामुळे महाराष्ट्रसह अनेक राज्यांमध्ये सीएनजी गॅसची, घरगुती गॅस, नैसर्गिक वायु आणि व्यावसायिक गॅस सिलिंडरचा तुटवडा जाणवू लागला आहे. तसेच हे युद्ध असेच सुरू राहिले तर याहीपेक्षा भयंकर परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

गॅस तुटवड्यामुळे पुण्यातील हॉटेल्समध्ये मेन्यू कार्ड बदलण्याची वेळी आल्याची माहिती समोर आली आहे. तसेच जे पदार्थ एकाचवेळी शिजवून तयार करता येतात असे पदार्थ ग्राहकांना देता येणे शक्य आहे. मात्र ऐनवेळी तयार करावे लागणारे पदार्थ देणे बंद केल्याचे हॉटेल्स व्यावसायिकांनी सांगितले आहे. पुणे हॉटेल असोसिएशनचे अध्यक्ष गणेश शेट्टी म्हणाले, ग्राहकांना इडली किंवा वडा मिळू शकतो पण डोसा मिळणार नाही. हे पदार्थ देखील पुढचे दोन दिवसच मिळू शकतील. गॅस पुरवठा पूर्ववत न झाल्यास पुण्यातील हॉटेल्स दोन ते तीन दिवसांत बंद पडतील, असा इशारा शेट्टी यांनी दिला आहे.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बधवार ११ मार्च २०२६


## जिल्हा नेतृत्वगुण विकास उद्बोधन शिबीर ११ मार्च ते १६ मार्च दरम्यान भांबर्डा येथे होणार

**करमाड** : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या मार्गदर्शनाखाली आणि राजीव गांधी कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,करमाड यांच्या संयुक्त विद्यमाने भांबर्डा येथे जिल्हा नेतृत्व गुण विकास उद्बोधन शिबिरास ११ मार्च २०२६ पासुन सुरुवात होणार असून, हे शिबीर १६ मार्च २०२६ पर्यंत चालणार आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वेगवेगळ्या महाविद्यालयांतील राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक या शिबिरामध्ये सहभागी होणार आहेत. शिबिरामध्ये नेतृत्व विकास, सामाजिक बांधिलकी, ग्रामविकास, संविधान मूल्ये, मानसिक आरोग्य, उद्योजकता अशा विविध विषयांवर तज्ज्ञ मान्यवरांचे मार्गदर्शन होणार आहे. विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे देखील आयोजन करण्यात येणार आहे.सदर शिबिरामध्ये उद्बोधन व्याख्यानमाला, ग्रामसंवाद, श्रमदान, ग्रामस्वच्छता, ग्राम सर्वेक्षण, राष्ट्रसेवेची भावना विकसित करण्याचा प्रयत्न या शिबिराच्या माध्यमातून स्वयंसेवकांमध्ये नेतृत्वगुण, सामाजिक जाणीव व राष्ट्रसेवेची भावना विकसित करण्याचा प्रयत्न करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा समन्वयक / रा.से.यो. कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. कालिदास फड यांनी दिली. शिबिराच्या यशस्वितेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.एस.मुळे, उपप्राचार्य प्रा. मनोज देवकर, नॅक समन्वयक डॉ.नरेश डहाळे, डॉ. आश्विनकुमार चिंचोलीकर, डॉ. बाळासाहेब लिहिणार, डॉ. लक्ष्मण दांडगे, डॉ. जयश्री पाटील, डॉ. किशोर काळे, डॉ. नितीन मुळे, डॉ. सौरभ चव्हान, डॉ. अतुल मोरे, डॉ. अमित राऊत, डॉ. ललित गोल्डे, डॉ. लावंड, डॉ. रमेश कचरे, डॉ.पठाण, डॉ.पोटदुखे, डॉ. शिंदे, प्रा. माठे, प्रा. खरात, प्रा. भावसार यांच्यासह महाविद्यालयातील कर्मचारी श्री. कैलास जाधव,श्री.प्रसन्न वैद्य,श्रीमती पारेकर, श्री.रमेश जाधव, श्री. मधुकर राठोड, श्री. ज्ञानेश्वर जाधव, श्री. मुक्तापुरे इत्यादी परिश्रम घेत आहेत.

## प्रोफेसर डॉ. महेश मोटे यांना 'मानद डॉक्टरेट' उपाधीने सन्मानित


Honorary Doctorate
Award Certificate
www.startupshikshafoundation.com I info@startupshikshafoundation.com
Enrollment No. HDACSSF-655648-2026 | SL. No. 96583048.2026.27
The Evaluation Board Of The StartupShiksha Foundation On The Recommendation Of The Board Of Directors And Council Administrators By The Virtue Of The Authority Vested In The Term Have Conferred On
Dr.Mahesh Kumar Mote
Professor & Academic Council Member of University, Member, Board of Studies, (of many universities ) PhD Research Guide & Nobel Nominee
Having Successfully Completed The Requirement And Therefore He is Awarded
Honorary Doctorate
( Honoris Causa ) With Specialization In
D LITT ( Education )
(Honoris Causa) With All Rights And Privileges, in Witness Whereof The Seal Of The Council is Hereunto Affixed On This 09th Day Of March, 2026
Authorized Signatory
For Verification : Startupshikshafoundation.com
This certificate is an honorary recognition awarded by StartupShiksha Foundation and is not an academic degree.

**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** शैक्षणिक, संशोधन आणि ज्ञानवर्धन क्षेत्रातील अतुलनीय योगदानाची दखल घेऊन स्टार्टअप शिक्षा फाउंडेशन, नवी दिल्ली यांच्या वतीने मुरुम येथील श्री माधवराव पाटील महाविद्यालयातील राज्यशास्त्र पदवी-पदव्युत्तर व संशोधन केंद्रातील समन्वयक प्रोफेसर डॉ. महेशकुमार नारायण मोटे यांना 'मानद डॉक्टरेट' या उपाधीने सन्मानित करण्यात आले आहे.डॉ. मोटे हे शैक्षणिक क्षेत्रात गेल्या ३० वर्षापासून राज्यशास्त्र विषयाचे अध्यापक म्हणून अविरतपणे कार्यरत असून ते एक व्यासंगी व नामांकित व्यक्तिमत्व म्हणून ओळखले जातात. सध्या छत्रपती संभाजीनगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या संशोधन समितीचे सदस्य, राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे सदस्य, नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठाच्या अभ्यास मंडळाचे सदस्य म्हणून कार्यरत आहेत. ते पीएच. डी. चे संशोधन मार्गदर्शक म्हणून त्यांच्या मार्गदर्शनाखाली १० विद्यार्थ्यांना पीएच. डी. अवॉर्ड झाली असून सध्या ६ विद्यार्थी पीएच. डी. संशोधनाचे कार्य करीत आहेत. त्यांच्या नावे ९ संदर्भ ग्रंथ व ७ स्पर्धा परीक्षेची पुस्तके प्रकाशित आहेत. त्यांनी विविध आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय परिषदांमध्ये सहभाग, पेपर वाचन करून त्यांचे ८० पेक्षा अधिक संशोधन लेख नामांकित जर्नल्स मध्ये प्रकाशित झाले आहेत. भारत सरकार डाक विभागाने माय स्टॅम्प मालिके अंतर्गत त्यांच्या नावे ६ टपाल तिकिटे प्रकाशित केली आहेत. त्यांनी सन २०१२ मध्ये थायलंड देशातील बँकॉक या ठिकाणी झालेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेत रिसर्च पेपर सादर करून थर्ड बेस्ट पेपर अवॉर्ड प्राप्त केले होते. त्यांनी आजवर ७५ च्या वर नामांकित संस्था, संघटनांकडून पुरस्कार प्राप्त केले आहेत. त्यांना ग्लोबल पीस युनिव्हर्सिटी, अमेरिका या नामांकित विद्यापीठाकडून कल्याण, मुंबई येथे डी. लीट. पदवी तर इतिहास एवं पुरातत्व शोध संस्थान, संग्रहालय, बालाघाट (मध्यप्रदेश) या नामांकित पुरातत्त्व शोध संस्थेकडून सन २०२५ मध्ये विद्या सागर ची मानद उपाधी (डी. लीट.) पदवी ने सन्मानित झाले. त्यांच्या दीर्घकालीन शैक्षणिक अनुभवाचा आणि समाजाप्रती असलेल्या सामाजिक योगदानाचा विचार करून दिल्ली येथील फाउंडेशनच्या मूल्यांकन व संचालक मंडळाने या उच्च सन्मानासाठी त्यांची दि.९ मार्च २०२६ रोजी अधिकृतरीत्या दखल घेऊन त्यांना तसे प्रमाणपत्र पाठविण्यात आले आहे. या मानद पदवीमुळे डॉ. मोटे यांच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून शैक्षणिक, पत्रकारिता, सामाजिक वर्तुळातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. या त्यांच्या यशाबद्दल त्यांचे सहकारी, विद्यार्थी, नातेवाईक, मित्रपरिवारांकडून विशेष कौतुक करून अभिनंदन केले जात आहे.

## पोटच्या मुलीवर ५ वर्षे लैंगिक अत्याचार



**मुंबई :** आपल्या पोटच्या मुलीवर पाच वर्षांपासून सातत्याने लैंगिक अत्याचार करणाऱ्या नराधम पित्याला सुनावण्यात आलेली आजन्म सश्रम कारावासाची शिक्षा मुंबई उच्च न्यायालयाने सोमवारी कायम ठेवली. केवळ रागाच्या भरात एखादी मुलगी आपल्याच वडिलांवर बलात्कारासारखा गंभीर आरोप करेल ही शक्यता अत्यंत दुरापास्त आणि अविश्वसनीय आहे, असे महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवत न्यायालयाने दोषी पित्याचे अपील फेटाळून लावले आणि त्याला सुनावण्यात आलेली शिक्षा योग्य ठरवली.

आग्रीपाडा येथील या पीडित मुलीने आपल्यावर होणाऱ्या अत्याचाराची तक्रार आईकडे वारंवार केली होती, मात्र त्याकडे दुर्लक्ष झाल्याने अखेर दहावीत असताना शाळेतील 'पोलिस दीदी' कार्यक्रमातून मिळालेल्या माहितीमुळे तिने धाडस दाखवत समुपदेशकांकडे आपबिती मांडली. वयाच्या दहाव्या वर्षांपासून वडिलांकडून सुरू असलेला लैंगिक छळ आणि किमान चार वेळा झालेल्या बलात्काराचा खळबळजनक खुलासा मुलीने आपल्या जबाबात केला होता. ज्यानुसार पोलिसांनी तातडीने कारवाई करत आरोपीला अटक केली आणि वैद्यकीय पुरावे तसेच नऊ महत्त्वाच्या साक्षीदारांच्या साक्षींच्या आधारे न्यायालयात हा गुन्हा सिद्ध केला.

विशेष पोक्सो न्यायालयाने १२ मार्च २०२० रोजी आरोपीला सुनावलेल्या आजन्म सश्रम कारावासाच्या शिक्षेविरोधात दाखल करण्यात आलेल्या अपिलावर न्यायमूर्ती मनीष पितळे आणि न्यायमूर्ती श्रीराम शिरसाट यांच्या खंडपीठाने सोमवारी आपला अंतिम निकाल जाहीर केला. या प्रकरणी सुनावणी पूर्ण झाल्यानंतर खंडपीठाने आपला निर्णय राखून ठेवला होता, जो आता जाहीर करत उच्च न्यायालयाने कनिष्ठ न्यायालयाची ती कठोर शिक्षा कायम ठेवली आहे.

खंडपीठाने नोंदवलेल्या निरीक्षणानुसार, "पालक मुलांना शिस्त लावतात, तेव्हा मुले चिडणे ही सामान्य बाब आहे. परंतु, केवळ त्या कारणावरून मुलगी वडिलांवर इतका गंभीर व दूरगामी परिणाम करणारा बलात्काराचा आरोप करेल, असे मानणे अविश्वसनीय आहे. तसेच पीडितेची साक्ष अत्यंत ठाम, सुसंगत व विश्वासार्ह आहे. गुन्हा निर्विवाद सिद्ध झाला असल्याचे देखील निरीक्षण खंडपीठाणे नोंदवले आहे.

## जीवन विकास ग्रंथालय वर्धापन दिन विशेष कार्यक्रम

**छत्रपती संभाजीनगर :** येथील जीवन विकास ग्रंथालयाच्या वर्धापन दिनानिमित्त तीन दिवस विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत .बुधवार, दिनांक ११ मार्च २०२६ रोजीसंत साहित्याचे अभ्यासक जयंत देशपांडे(धानोरकर) यांचे तुका झालासे कळस या विषयावर व्याख्यान होणार आहे.गुरुवार दिनांक १२ मार्च २०२६ रोजी मारुडरत्न शेखर निरंजन भाकरे हे भारूडरंग या विषयावरील कलाकारी सादर करतील. शुक्रवार दिनांक १३ मार्च २०१६ रोजी ओंजळ महिला मंडळाच्या सहकार्याने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून वाचन विकासात ग्रंथालय व्यवस्थापनातील महिलांची भूमिका या विषयावर परिसंवाद होईल. या परिसंवादात सौ. आशा कोरान्ने, सौ. सुमेधा देशपांडे, सौ. संगिता मंडलिक, सौ. संध्या राजेंद्र स्नेही सहभागी होतील. या परिसंवादाचे अध्यक्षस्थानी डॉ. छाया महाजन राहतील.दररोज संध्याकाळी साडेसहा वाजता टिळकनगर येथे जीवन विकास ग्रंथालयाच्या *ग्रंथमित्र भा. बा. आर्वीकर सभागृहात होणाऱ्या या कार्यक्रमासाठी वाचकांनी आणि रसिक नागरिकांनी बहुसंख्येने उपस्थित राहावे असे आवाहन ग्रंथालयाचे अध्यक्ष न्या. अंबादासराव जोशी व डॉ. राजशेखर बालेकर (कार्यवाह), नितीन कंधारकर (कोषाध्यक्ष), नृसिंह कुलकर्णी (सहकार्यवाह) आदींनी केले आहे.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बधवार ११ मार्च २०२६

## सार्वजनिक जीवनात आणि समाज माध्यमावर वावरताना आजच्या युवतीनी समाज भान बाळगावे- श्रीमती शोभाताई ढोके




**नागपूर (चंद्रशेखर पाटील) :** "सत्कार हा व्यक्तीचा होत नसून तो व्यक्ती च्या कर्तृत्वाचा होत असतो. आयुष्यात कितीही संघर्ष आणि हाल अपेष्टा वाट्याला आल्या तरी स्त्रीने आपले पाऊल डगमगू देऊ नये. आपल्या स्वत्व आणि चारित्र्याशी तडजोड करू नये. जिजाई, सावित्री आणि रमाई ह्या आजच्या आधुनिक आणि सुशिक्षित स्त्री च्या आदर्श असल्या पाहिजेत. इंटरनेट व समाज माध्यमावर वावरताना आजच्या आधुनिक तरुणीनी आणि स्त्रियांनी स्त्री अस्मितेच्या मर्यादा पाळल्या पाहिजेत तसेच सार्वजनिक जीवनात समाज भान जपले पाहिजे. " असे प्रबोधनात्मक आणि तितकेच परखड विचार जेष्ठ स्त्रीवादी सामाजिक कार्य कर्ता आणि माजी पंचायत समिती सदस्य श्रीमती शोभा ताई ढोके यांनी व्यक्त केले. डॉ. मधुकरराव वासनिक पी. डब्ल्यू. एस. कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयामध्ये आयोजित महिला दिनाच्या प्रमुख अतिथी म्हणून त्या बोलत होत्या. सोबतच त्यांनी आपला उच्च शिक्षणासाठी एक ग्रामीण स्त्री म्हणून वाट्याला आलेला जीवन संघर्ष सभा गृहासमोर मांडला. स्थानिक डॉ. मधुकरराव वासनिक पी. डब्ल्यू एस कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, कामठी रोड येथे नुकतेच उत्साहात जागतिक महिला दिन समारोहाचे आयोजन नुकतेच करण्यात आले. याप्रसंगी खापरखेडा पंचायत समिती च्या माजी सदस्य आणि धडाडीच्या स्त्री सामाजिक कार्य कर्ता श्रीमती. शोभाताई ढोके यांना प्रमुख अतिथी म्हणून आमंत्रित करण्यात आले. उत्तर नागपूर प्रभाग 2 च्या नवनियुक्त नगर सेविका आणि महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थीनी सौ. संगीता पाटील आणि नागपूर महा नगर पालिका, आसि नगर झोन, चे महिला आणि बाल कल्याण विभागाचे आयुक्त श्री. भोला खोब्रागडे यांना विशेष अतिथी म्हणून निमंत्रित करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान प्राचार्या डॉ. प्रज्ञा बागडे यांनी भूषविले. याप्रसंगी उप प्राचार्या प्रा. गामिनी मेश्राम आणि एम. सी. व्ही. सी. विभाग प्रमुख प्रा. रेखा बावनकुळे आणि महिला समिती च्या समन्वयक डॉ. अमृता डोरलीकर यांची विशेष उपस्थिती होती. महिला दिनाचे औचित्य साधून श्रीमती शोभा ताई ढोके, सौ. संगीता पाटील आणि श्री. भोला खोब्रागडे यांचा महाविद्यालयाच्या वतीने शाल आणि सन्मानचिन्ह देऊन विशेष सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. "स्त्री ही सशक्त झाली तरच समाज सक्षम होईल. स्त्री अनेक भूमिकेतून समाज निर्मिती आणि राष्ट्र निर्मितीत मोला चे योगदान देत असते. " असे विचार सत्कार मूर्ती सौ. संगीता पाटील यांनी व्यक्त केले. "सर्व नागरिकांनी आपले कर्तव्य प्रामाणिक पणे पार पाडणे आवश्यक आहे. कचरा व्यवस्थापन हा वैयक्तिक स्वास्थ्य सोबतच सामाजिक आरोग्यासाठी देखील आवश्यक आहे. कोविड काळात कचरा व्यवस्थापन आणि सार्वजनिक आरोग्य सुदृढ पणे सांभाळण्यात महा नगर पालिकेच्या सर्व महिला सफाई कर्मचाऱ्यांनी भरीव योगदान केले आहे." याची आठवण याप्रसंगी श्री. भोला खोब्रागडे यांनी आपल्या भाषणातून उपस्थितांना करून दिली. सोबतच भविष्यात कचरा व्यवस्थापनावर महाविद्यालया मध्ये एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्याची सूचना व्यक्त केली.आपल्या अध्यक्षीय वक्तव्या मध्ये " ग्रामीण भागातील महिलांच्या उत्तुंग कार्याची दखल फारशी घेतली जात नाही. ग्रामीण महिलांचे कार्य कर्तृत्व, सामाजिक संघर्ष व समर्पण आणि सामाजिक जाणीव याला देखील सन्मान प्राप्त व्हावा. बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान निर्मिती तुन महिलांना विशेष अधिकार देऊन स्त्रियांना सर्व तोपरी सक्षम केले आहे. असे विचार प्राचार्या डॉ. प्रज्ञा बागडे यांनी व्यक्त केले.कार्यक्रमाची प्रास्ताविक भूमिका महिला समितीच्या समन्वयक डॉ. अमृता डोरलीकर यांनी विषद केली. सर्व सत्कार मूर्ती आणि मान्यवरांचा परिचय प्रा. सरोज वटे यांनी सभागृहास करून दिला. या कार्यक्रमाचे सूत्र संचालन डॉ. आसिया सय्यद यांनी केले तर मान्यवरांचे आणि उपस्थित श्रोत्यांचे आभार प्रा. रुचिका वासनिक यांनी मानले.याप्रसंगी वरिष्ठ आणि कनिष्ठ महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक वृंद, अंशकालीन प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी आवर्जून उपस्थित होते. कार्यक्रम महाविद्यालयाच्या प्रथे नुसार राष्ट्रगीताने संपन्न झाला.

## प्रत्येक महिलेने आर्थिक सक्षम होणे गरजेचे - न्या. संगीता शिंदे




**बीड (भगवंत पाळवदे) :** किमान समान कार्यक्रम माहे मार्च २०२६ अंतर्गत दिनांक ८ मार्च रोजीच्या जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बीड व स्वातंत्र्य सैनिक रामराव आवरगावकर विधी महाविदयालय, बीड यांचे संयुक्त विद्यमाने दिनांक ९ मार्च २०२६ रोजी सकाळी ९-०० वाजता महिला दिन कार्यक्रम आयोजन विधी महाविद्यालय, बीड येथे करण्यात आले होते.सदर कार्यक्रमास मुख्य अतिथी म्हणून एस.आर.शिंदे, जिल्हा न्यायाधीश-२ बीड तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव डॉ. वहाब ए.सयद, माजी आमदार राजेंद्र जगताप हे कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. तसेच महाविदयालयाचे सदस्य ॲड.एन.एन.साबळे, ॲड.के. एस.पंडीत, महाविद्यालयाचे प्राचार्य, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अधिक्षक एस.टी.शिंदे तसेच पीएलव्ही तत्वशिल कांबळे, अशोक तांगडे तसेच महाविदयालयाचे सर्व प्राध्यापक यांची उपस्थिती होती.सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ.शेख अनिसूर रहेमान यांनी केले. त्यानंतर मुख्य अतिथी एस.आर.शिंदे, जिल्हा न्यायाधीश-२, बीड यांनी आपल्या भाषणात सांगितले की, प्रत्येक महिलेने आर्थिक सक्षम होणे गरजेचे आहे. आर्थिक सक्षम झालेल्या महिलेने पुरूषावर अवलंबून न राहता स्वः अर्थार्जन करावे. संविधानाने समानतेचा अधिकार दिलेला आहे. त्याचा पुरेपुर वापर करून प्रत्येक महिला सक्षम व्हावी या करिता प्रत्येक पुरूषाने जाणीवपूर्वक प्रयत्न करणे गरजेचे आहे. महिलांच्या उन्नतीसाठी पुरूष सामाजिक कार्यकत्र्याने खूपमोठे प्रयत्न केलेले आहेत. सावित्रीबाईंना घडवण्यासाठी ज्योतिबा फुले, सतीची प्रथा बंद करण्यासाठी राजाराम मोहन रा◌ॅय, संसदेमध्ये हिंदू कोड बिल पास करण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर या सर्व महापुरूषांनी आपले योगदान दिलेले आहे. पुरूषांनी स्त्रियांना समानतेची वागणूक दयावी. याची अंमलबजावणी सर्वत्र झाल्यास यापुढे महिला दिन साजरा करण्याची आवश्यकता राहणार नाही. महिलांवरील अत्याचाराचे सर्वाधिक प्रमाण हे बीड जिल्हयात असल्याचे दिसून आले आहे. त्यांनी महिलांच्या कायदेशीर हक्कावंर भाष्य करत उपस्थितांना मार्गदर्शन केले.जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव डॉ.वहाब ए.सयद यांनी आपल्या भाषणात सांगितले की, महिलांचे कौटुंबिक हिसांचारापासून संरक्षण करणेकरिता असलेल्या प्रभावी कायदयाची माहिती उपस्थित विदयार्थी/विद्यार्थिनींना करून दिली. स्त्री सन्मान आणि त्यांचे कायदेशीर अधिकाराची माहिती या कार्यक्रमात देण्यात आली.सदर कार्यक्रमात महाविदयालयाच्या विदयार्थ्यांनी महिला सक्षमीकरण आणि स्त्री हक्क या विषयावर प्रभावी सादरीकरण केले. तसेच विदयार्थ्यांनी स्वतः तयार केलेल्या सांविधानिक हक्क या विषयावरील भित्तीपत्रकांचे भव्य प्रदर्शन यावेळी भरविण्यात आले होते.

## जाहिरात दर

१. पूर्ण पान (मल्टीकलर) ५०००/-
२. अर्धे पान (मल्टीकलर) ३०००/-
३. पाव पान (मल्टीकलर) २०००/-
४. शुभेच्छा जाहिरात ६००/-

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बधवार ११ मार्च २०२६


## उठा तरुणांनो सिद्ध व्हा!

उठा तरुणांनो सिद्ध व्हा!
निराश होऊन बसू नका.
तयारी करतांना यशाची,
निराशेला कोसो दुर फुका!

यशस्वी व्हायचे असेल तर,
सदा सर्वदा प्रयत्न करा!
यशाचा मार्ग चालतांना,
सदा संयमाने धीर धरा!

निराशेने खचून जाऊन,
प्रयत्नात पडू नये खंड.
प्रयत्न कर शेवटपर्यंत,
संकटांशी करून बंड.

यश नक्की मिळणारच,
स्पर्धेत मात्र टिकून रहा!
संकटे येतात जातात,
सकारात्मकतेने सदा पहा!



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

# मोठी स्वप्न पहावी, त्यासाठी कठोर परिश्रम, जिद्द आणि चिकाटी ठेवाल तर यश मिळवाल




**उमरगा** : आजच्या काळात महिला कोणत्याही क्षेत्रात मागे नाहीत. शिक्षण, विज्ञान, क्रीडा, प्रशासन, उद्योग या सर्व क्षेत्रात महिलांनी आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे. महिलांच्या मध्ये अपार क्षमता आहे. मोठी स्वप्ने पाहा, कठोर परिश्रम करा आणि आत्मविश्वासाने पुढे जा. शिक्षण हेच तुमचे सर्वात मोठे शस्त्र आहे. तुम्हीच उद्याच्या भारताचे भविष्य घडवणार आहात.यासाठी जिद्द व परिश्रम आणि चिकाटी असेल तर यश प्राप्त कराल असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. संजय अस्वले यांनी केले. येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात वाणिज्य मंडळ ,महाविद्यालय महिला सबलीकरण कक्ष आणि महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र आयोजित करिअर कट्टा यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार दिनांक १० मार्च रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्मृतिदिन व जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात अध्यक्षीय समारोपात डॉ अस्वले बोलत होते. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्मृतिदिन आणि जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून गुंजोटी येथील यशस्वी महिला उद्योजक सौ.अस्मिता सूर्यवंशी, सौ. यशोदा रामतीर्थे, सौ. हिरकणा थिटे आणि कु.शुभांगी सीतापुरे या यशस्वी महिलांचा यथोचित सन्मान करण्यात आला. याप्रसंगी वाणिज्य विभागाचे विभागप्रमुख प्रा. डॉ. अजित आष्टे, करिअर कट्टा समन्वयक प्रा. डॉ. समाधान पसरकल्ले, प्रा. डॉ.अर्जुन कटके, प्रा. डॉ. चंद्रसेन करे, प्रा. खंडू मुरळीकर, प्रा.विजयकुमार मुळे, महिला सक्षमीकरण कक्षाच्या समन्वयिका प्रा. रेश्मा नितनवरे, डॉ एम. एस. निर्मळे, डॉ. पी. एल. सावंत, डॉ ए. एस. शिंदे, डॉ प्रतिभा गायकवाड, प्रा. बी ए लोकरे, प्रा. ज्योती जोगदापके, डॉ चोचंडे मॅडम, प्रा विद्या गायकवाड, प्रा. अक्षता बिराजदार, निकिता जाधव, अनिशा सुरवसे, विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु.अनिषा सुरवसे यांनी तर आभार कु. पूजा हांडे यांनी मांडले.

# रमजान महिना : संयम, श्रद्धा आणि मानवतेचा संदेश-लेखमाला-१

इस्लाम धर्मात रमजान (रमदान) हा अत्यंत पवित्र आणि महत्त्वाचा महिना मानला जातो. इस्लामी चांद्र दिनदर्शिकेतील नववा महिना म्हणजे रमजान. या महिन्यात मुस्लिम बांधव उपवास (रोजा) ठेवून अल्लाहची प्रार्थना करतात, आत्मशुद्धी करतात आणि मानवतेचा संदेश देतात. संयम, करुणा, दानधर्म आणि आत्मनियंत्रण या मूल्यांची जाणीव करून देणारा हा महिना आहे.रमजान महिन्याची ओळखरमजान महिन्याची सुरुवात चंद्र दर्शनाने होते. चंद्र दिसल्यानंतर दुसऱ्या दिवसापासून रोजा ठेवण्यास सुरुवात होते. संपूर्ण महिनाभर मुस्लिम बांधव पहाटेपासून सूर्यास्तापर्यंत अन्न आणि पाणी घेत नाहीत. याला रोजा किंवा उपवास असे म्हणतात.पहाटे घेतल्या जाणाऱ्या भोजनाला सहरी (सेहरी) म्हणतात, तर सूर्यास्तानंतर रोजा सोडताना घेतल्या जाणाऱ्या भोजनाला इफ्तार म्हणतात. इफ्तारच्या वेळी खजूर, फळे आणि इतर पदार्थ घेऊन रोजा सोडण्याची परंपरा आहे.रोजा ठेवण्यामागील उद्देशरमजानमधील रोजा हा केवळ उपवास नसून तो आत्मसंयम आणि आत्मशुद्धीचा मार्ग आहे.रोजा ठेवण्यामागील काही महत्त्वाचे उद्देश :आत्मसंयम आणि शिस्त निर्माण करणेगरीब व गरजूंच्या वेदना समजून घेणेवाईट विचार व वाईट कृत्यांपासून दूर राहणेश्रद्धा आणि अध्यात्मिकता वाढवणेया महिन्यात मुस्लिम बांधव अधिकाधिक नमाज, कुरआन पठण आणि दानधर्म करतात.रमजानमध्ये केले जाणारे धार्मिक विधीरमजान महिन्यात अनेक धार्मिक परंपरा पाळल्या जातात.महत्त्वाचे धार्मिक आचार :दिवसातून पाच वेळा नमाज अदा करणेकुरआनचे पठण करणेरात्री विशेष नमाज – तरावीह अदा करणेगरजू लोकांना मदत करणेजकात आणि फित्रा देणेजकात म्हणजे आपल्या संपत्तीचा काही भाग गरीबांना देणे. हे इस्लाम धर्मातील एक महत्त्वाचे कर्तव्य मानले जाते.रमजान आणि मानवतेचा संदेशरमजान महिना केवळ धार्मिक साधनेचा नाही, तर मानवतेचा आणि बंधुभावाचा संदेश देणारा महिना आहे. या महिन्यात लोक एकमेकांना मदत करतात, गरजूंची काळजी घेतात आणि समाजात प्रेम व ऐक्य वाढवण्याचा प्रयत्न करतात.इफ्तारच्या वेळी अनेक ठिकाणी सर्व धर्मीय लोक एकत्र येऊन भोजन करतात. त्यामुळे सामाजिक ऐक्य आणि सौहार्द वाढते.रमजानचा समारोप – ईद उल फित्ररमजान महिन्याच्या शेवटी ईद उल फित्र हा सण मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. या दिवशी मुस्लिम बांधव मशिदीत विशेष नमाज अदा करतात, एकमेकांना शुभेच्छा देतात आणि गोड पदार्थ वाटून आनंद साजरा करतात.ईद हा आनंद, प्रेम आणि बंधुभावाचा सण मानला जातो.निष्कर्षरमजान महिना आपल्याला संयम, दया, त्याग आणि मानवतेचे मूल्य शिकवतो. आत्मशुद्धी, समाजसेवा आणि बंधुभाव वाढवणारा हा महिना सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. धर्म, जात आणि पंथ यापलीकडे जाऊन मानवतेचा संदेश देणारा रमजान महिना समाजात शांतता आणि सौहार्द निर्माण करण्यास मदत करतो.



**भगवंत पाळवदे**
**अंबाजोगाई. मो. ९९७५७ ०४३९१**


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बधवार ११ मार्च २०२६

## पु. ल. देशपांडे कला अकादमीचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम; अर्जाची मुदत २२ मार्च

**बीड (भगवंत पाळवदे)** : दि.१० : सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, प्रभादेवी येथे महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास मंडळाच्या संलग्नतेने १ एप्रिल २०२६ पासून दृकश्राव्य माध्यमांचे अल्पमुदतीचे व्यावसायिक प्रशिक्षण वर्ग सुरू करण्यात येत आहेत. स्क्रीनराईटींग, फिल्म डायरेक्शन, बेसिक सिनेमॅटोग्राफी, फिल्म एडिटिंग, साऊंड रेकॉर्डिंग, व्हॉइस ओव्हर आर्टिस्ट, लाईव्ह साऊंड रेकॉर्डिंग, असिस्टंट कोरिओग्राफर, फिल्म प्रॉडक्शन असिस्टंट, इव्हेंट प्रॉडक्शन अँड मॅनेजमेंट, फिल्म प्रॉडक्शन अँड मार्केटिंग असे एकूण ११ अल्पमुदतीचे व्यवसायाभिमुख प्रमाणपत्र अभ्यासक्रम राबविण्यात येणार आहेत. हे अभ्यासक्रम सैद्धांतिक, प्रात्यक्षिक आणि कौशल्य या त्रिसूत्रीवर आधारित असून प्रत्येक अभ्यासक्रम हा ३ महिने मुदतीचा असेल. माध्यम तंत्रज्ञान क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांकडून गूगल फॉर्म द्वारे २२ मार्च २०२६ पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत. तसेच वरील ११ अभ्यासक्रमांसाठी तज्ज्ञ आणि अनुभवी व्याख्यात्यांची नियुक्ती करावयाची असल्यामुळे संबंधित क्षेत्रातील शैक्षणिक अध्यापनाचा अनुभव असलेल्या उमेदवारांकडूनही आपला व्यक्तिगत तपशील व अनुभवाच्या दाखल्यासहीत अर्ज मागविण्यात येत आहेत. दोन्हीसाठींचे अर्ज अकादमीच्या www.pldeshpandekalaacademy.org (अभ्यासक्रम) या संकेतस्थळावर गूगल फॉर्मद्वारे २२ मार्च २०२६ सायं. ५ वाजेपर्यंत मागविण्यात येत आहेत. अधिक माहितीसाठी व्हॉट्सअॅप क्र.९८१९८२४९५४ वर संपर्क साधता येईल.ठळक वैशिष्ट्ये* दृक श्राव्य माध्यमांतील तांत्रिक विषयांचे ११ अल्पमुदतीचे अभ्यासक्रम* १८,००० ते ५२,५०० रुपये इतक्या माफक शिक्षण शुल्कात आधुनिक काळाशी सुसंगत माध्यम शिक्षण घेण्याची संधी* थिअरी आणि प्रात्यक्षिके यांचा उत्तम समन्वय असलेले परिपूर्ण अभ्यासक्रम* दृकश्राव्य क्षेत्रातील तज्ज्ञांचे मार्गदर्शन* अद्ययावत उपकरणांवर प्रात्यक्षिके* प्रत्यक्ष कामाचा अनुभव घेण्याची संधी* दृक श्राव्य क्षेत्रात रोजगाराची संधी* दृक श्राव्य क्षेत्रासाठी प्रशिक्षित व प्रमाणित मनुष्यबळाची उपलब्धता* सहकारी बँकांमार्फत गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना कर्जाची सुविधा उपलब्ध करून देण्याचे सहकार आयुक्तांचे बँकांना आदेश* पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आणि राज्य कौशल्य विकास मंडळाचे उत्तीर्ण विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र. राज्याच्या सांस्कृतिक कार्य विभागातर्फे प्रथमच पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीत अशा प्रकारचा शैक्षणिक उपक्रम राबविण्यात येत असून माध्यम प्रशिक्षण अभ्यासक्रमांत प्राविण्य मिळवून टेलिव्हिजन, वेब, चित्रपट तसेच एकूणच दृकश्राव्य माध्यमांत करिअर करू इच्छिणाऱ्या उमेदवारांनी या सुसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन सांस्कृतिक कार्य मंत्री अॅड. आशिष शेलार यांनी केले आहे.

## छत्रपती संभाजीनगर हायवेवर शहादा डेपोची एसटी बस आगीत भस्मसात



**छत्रपती संभाजीनगर** : -धुळे हायवेवर आज दुपारी एक काळजाचा थरकाप उडवणारी घटना घडली. शहादा डेपोच्या एका एसटी बसला भीषण आग लागली. ही घटना खुलताबाद तालुक्यातील पळसवाडी शिवारातील हॉटेल आम्रपालीसमोर दुपारी 4 वाजेच्या सुमारास घडली. सुदैवाने, बसमधील प्रवासी जेवणासाठी खाली उतरलेले असतानाच ही आग लागल्याने एक मोठा अनर्थ टळला असून सर्व प्रवासी सुखरूप आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाची शहादा डेपोची बस (शहादा ते संभाजीनगर) प्रवाशांना घेऊन जात होती. लांबचा प्रवास असल्यामुळे दुपारी 4 वाजेच्या सुमारास चालक आणि वाहकाने बस पळसवाडी येथील हॉटेल आम्रपालीवर जेवणासाठी थांबवली होती. प्रवासी जेवणासाठी खाली उतरले आणि काही वेळातच बसच्या इंजिनमधून धूर निघू लागला. पाहता पाहता आगीने रौद्र रूप धारण केले आणि संपूर्ण बस आगीच्या विळख्यात सापडली. प्राथमिक अंदाजानुसार, ही बस शहादा येथून सतत धावत असल्याने इंजिनमध्ये मोठ्या प्रमाणात उष्णता (ओव्हरहीटिंग) निर्माण झाली होती. यामुळे शॉर्ट सर्किट होऊन आग लागल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

बस थांबलेली असताना ही घटना घडल्याने प्रवाशांना वेळीच सुरक्षित अंतरावर हलवणे शक्य झाले. बस जळून खाक झाल्याने प्रवाशांचे प्रचंड हाल झाले. भर उन्हात 50 प्रवासी महामार्गावर अडकून पडले होते. काहींचे महत्त्वाचे कागदपत्र आणि सामानही या आगीत जळाल्याची भीती व्यक्त केली जात आहे. एसटी प्रशासनाने या तांत्रिक बिघाडाची आणि सुरक्षेच्या साधनांच्या अभावाची सखोल चौकशी करण्याचे आश्वासन दिले आहे. मात्र, 50 जणांचा जीव धोक्यात घालणाऱ्या या हलगर्जीपणावर खरोखर कारवाई होणार की नेहमीप्रमाणे कागदी घोडे नाचवले जाणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## सावित्रीबाई फुले या उत्तम कवयित्री होत्या - प्रदेश प्रवक्त्या रेखाताई सूर्यवंशी





**उमरगा : (प्रा. नागसेन कांबळे)** : तालुक्यातील गुंजोटी येथे श्रीकृष्ण महाविद्यालयात महिला तक्रार निवारण केंद्र व मराठी विभागाच्या वतीने आयोजित जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला त्यावेळी त्या प्रमुख वक्त्या म्हणून याप्रसंगी बोलत होत्या.रेखा सूर्यवंशी या जिजाऊ ब्रिगेडच्या प्रदेश प्रवक्त्या आहेत. यावेळी व्यासपीठावर अध्यक्ष म्हणून श्रीकृष्ण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गुलाब राठोड हे होते तर प्रमुख उपस्थितांमध्ये श्रीकृष्ण शिक्षण संस्थेच्या स्वीकृत सदस्या वैशालीताई कदेरें, श्रीकृष्ण शिक्षण संस्थेच्या उपसचिव डॉ.शालिनीताई पाटील, प्रसिध्द स्त्रीरोग तज्ञ डॉ.अंबिकाताई पतंगे या व्यासपीठावर विराजमान होत्या. प्रदेश प्रवक्त्या रेखाताई सूर्यवंशी पुढे म्हणाल्या की स्त्रियावर ज्या काळात प्रचंड बंधने होती, सर्वदूर कालाकुट्ठ अंधार होता, अत्यंत प्रतिकूल परिस्थिती असतानाही सावित्रीबाई फुले यांनी मुलींची पहिली शाळा काढून क्रांती केली. न मागता भारतीय स्त्रियांना मतदानाचा अधिकार दिला. शिव, फुले, शाहू, आंबेडकरांच्या प्रयत्नामुळे आणि भारतीय संविधानामुळे आज आपल्याला सर्वाधिकार प्राप्त झाले आहेत. आज सर्वच क्षेत्रात महिला आघाडीवर आहेत परंतु म्हणावे तसे आजही स्त्रिया विविध क्षेत्रात सक्रिय नाहीत. मुळात स्त्री ही निसर्गतः सृजनशील आहे. ती निर्माती आहे. स्त्रियांनी आपले पुढच्या भविष्याचे प्लॅनिंग करायला हवे. व्यवस्थितपणा व व्यवस्थापकपणा हा तिचा अंगभूत गुण आहे. ज्या समाजातील आणि देशातील स्त्री ही शिक्षित व स्वावलंबी आहे त्या देशाचे भविष्य उज्वल आहे. माँ जिजाऊनी जसा शिवबा घडवला तसा शिवबा आज आपल्याला घडवता आला पाहिजे. शिवाजी जन्माला यावा पण तो दुसऱ्याच्या घरी ही मानसिकता आपण बदलली पाहिजे. आई म्हणून आपले कर्तव्य पहिल्यांदा आपण पार पडले पाहिजे. आपण बहीण, मामी, काकी, सुन, नणंद, आत्या, याशिवाय बरेच नाते निभावत असतो आणि निभावलेही पाहिजे पण सर्वात महत्वाचे म्हणजे आपण एक आई आहोत, माता आहोत हे कधीही विसरता कामा नये. आज आपल्याकडे सर्व सुविधा आहेत. कायद्याद्वारे का होईना आज आपल्याला पुरुषाच्या बरोबरीने समान अधिकार आणि संधी आहे, त्याचा पुरेपूर वापर करून आपण स्वतःला सिद्ध केले पाहिजे असे आवाहन त्यांनी केले. प्रेरणादायी कवितांचे वाचन करून उपस्थिताना स्फूर्ती दिली. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. गुलाब राठोड यांनीही या कार्यक्रमामागील भूमिका स्पष्ट करत महाविद्यालयाच्या वतीने उमरगा व परिसरातील विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या व आपल्या कार्याने त्या क्षेत्रात आपल्या व्यक्तिमत्वाचा ठसा उमटविलेल्या अनेक महिलांचा सत्कार करण्याचा निर्णय घेतला. जेणेकरून त्यांना त्यांच्या पुढील काळात अधिक जोमाने कार्य करण्याचे बळ मिळेल. आज महिलांनी स्वतःला सिद्ध केल्याचे सांगून प्राचार्य डॉ. गुलाब राठोड यांनी पुढील काळात यापेक्षा जास्त महिलांचा सत्कार करता यावा अशी परिस्थिती निर्माण व्हावी अशी अपेक्षा व्यक्त केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. आसिया चिश्ती यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. संतोषी गायकवाड यांनी केले तर प्रा. डॉ. मल्लमा आंबुसे यांच्या आभारप्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

ADMISSION OPEN

10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses

DMLT
P.G.DMLT
X-RAY
C.T.-SCAN
E.C.G.
Radiology
Physiotherapy
Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology

Contact: 9405109103
8830838903